## *Appendix IX (iii)*, (Vide Article - 9.01 (ix-c))

**संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील प्रवेश शुल्क मनोरंजनाच्या सुविधांचे दर व प्रभात फेरीसाठीच्या दरात वाढ करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : डब्ल्यूएलपी १०-११/प्र.क्र.१४४/फ-१,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १७.०६.२०११.

वाचा :- १. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, डब्ल्यूएलपी १०-२००० / प्र. क्र.६२/फ-१, दि. ३१.०८.२००० व दि. १७.०५.२००४.

२. प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष - २२ (७) / ५० / २०१० - ११, नागपूर, दिनांक ०७.०४.२०११.

**प्रस्तावना :-**

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानतील प्रवेश शुल्क व मनोरंजनाच्या सुविधांद्वारे प्राप्त होणाऱ्या निधीमधून हा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानांच्या व्यवस्थापनासाठी वापरण्यात देतो. त्या निधीतून संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाची देखरेखीची कामे रोजदारी मजूरांकडून करून घेण्यात येता. सद्यस्थितीत रोजंदारी मजूरांच्या वेतनात वाढ झाली आहे त्या अनुषंगाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानतील प्रवेश शुल्क व मनोरंजनाच्या सुविधांद्वारे प्राप्त होणाऱ्या निधीमधून संजय गांधी राष्ट्री उद्यानाच्या देखरेखी व व्यवस्थापनाची कामे योग्य रित्या करणे अवघड होत आहे.

सबब संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील प्रवेश शुल्क मनोरंजनाच्या सुविधांचे दर व प्रभात फेरीसाठीच्या दरात वाढ करणे प्रस्तावित आहे.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेतील विवेचनाच्या अनुषंगाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील प्रवेश शुल्क मनोरंजनाच्या सुविधांचे दर व प्रभात फेरीसाठीच्या दरात खालीलप्रमाणे वाढ करण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | सध्याचे प्रचलित दर रुपये | सुधारीत दर रुपये |
|---|---|---|---|
| शासन निर्णय क्रमांक डब्ल्युएलपी- १०.२०००/ प्र.क्र६२/फ-१ दिनांक १७/५/२००४ अन्वये प्रचलीत दर लागु करण्यात आले. | | | |
| १ | पायी येणारे पर्यटकासाठी प्रवेश शुल्क १२ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या व्यक्ती | रु.२०/- प्रती व्यक्ती | रु.३०/- प्रती व्यक्ती |
| २ | पायी येणार पर्यटकासाठी प्रवेश शुल्क ०५ ते १२ वर्षापर्यंतच्या वय असलेल्या मुलांसाठी | रु.१०/- प्रती व्यक्ती | रु.१५/- प्रती व्यक्ती |
| ३ | ५ वर्षापेक्षा कमी वय असलेल्या मुलासाठी | निःशुल्क | निःशुल्क |
| ४ | वाहनाचे शुल्क स्कुटर /रिक्षा | रु.१५/- | रु.२५/- |
| ५ | हलकी वाहने (कार/जीप्स) | रु. ५०/- | रु.१००/- |
| ६ | जड वाहने (ट्रक,बस,ट्रॅक्टर) | रु.७५/- | रु.१५०/- |
| ७ | प्रभातफेरी जेष्ठ नागरिक पुरुष -६५ वर्षे व अधिक | रु.१/- वार्षीक | रु.१२/-वार्षीक |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | प्रभात फेरी ईतर नागरिकांसाठी | रु.१५/- मासीक किंवा रु. ५०/- वार्षीक | रु. २५/- मासीक किंवा रु. १००/- वार्षीक |
| शासन निर्णय क्रमांक डब्लुएलपी- १०.२०००/ प्र.क्र६२/फ-१ दिनांक ३१/८/२००० अन्वये प्रचलीत दर दिनांक ०१ सप्टेंबर २००० पासून लागु करण्यात आले. | | | |
| ९ | मिनीट्रेन प्रती फेरीस १२ वर्षाखालील व्यक्ती | रु.१५/- | रु.२५/- |
| १० | मिनी ट्रेन प्रती फेरीस ५ ते१२ वर्षापर्यंतच्या मुलासाठी | रु.७/- | रु.१०/- |
| ११ | व्याघ्र विहार प्रौढास १२ वर्षावरील व्यक्ती | रु.२०/- | रु.४०/- |
| १२ | व्याघ्र विहार मुलास ५ते १२ वर्षाचे मुलासाठी | रु.१०/- | रु.१५/- |
| १३ | सिंह विहार व व्याघ्र विहार एकत्रीत (प्रौढास १२ वर्षावरील) | रु.३०/- | रु.५०/- |
| १४ | सिंह विहार व व्याघ्र विहार एकत्रीत (मुलास ५ वर्षावरील) | रु.१५/- | रु.२०/- |
| १५ | कान्हेरी बस सेवा १२ वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या व्यक्ती | रु.२०/- | रु.३०/- |
| १६ | कान्हेरी बस सेवा०५ ते१२ वर्षापर्यंतच्या मुलांसाठी | रु.१०/- | रु.१५/- |
| १७ | नौका विहार २ आसनाच्या नौका (१५ मिनीटासाठी) | रु.२०/- | रु.३०/- |
| १८ | नौका विहार ४ आसनाच्या नौका (१५ मिनीटासाठी) | रु.४०/- | रु.६०/- |

सदरची दरवाढ ही दिनांक ०१.०७.२०११ रोजी पासून लागु करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र.१७०/११/व्यय-१०, दि.१६.०६.२०११ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(विजय सूर्यवंशी)
विशेष कार्य अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर,
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य,नागपूर,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई.
वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली.
महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), म.रा.मुंबई/नागपूर,
फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती).

---------